**अर्जदार शकुंतला अमोल सोनटक्के यांचा शपथेवर उलटतपास सामनेवालातर्फे ॲड एस. के. आंधळे वकील यांचे मार्फत सुरु-**

हे म्हणणे खरे आहे की, अमोल हे माझे पती असुन सामनेवाला नं. २ व ३ हे माझे सासु - सासरे व सामनेवाला नं. ४ हे माझे दिर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला नं. १ हा माझ्या आत्याचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, विवाहापुर्वी सामनेवाला नं. १ व मी एकमेकांना चांगले ओळखत होतो. हे म्हणणे खरे आहे की, दि. १२/०५/२०१९ रोजी आमचे परस्पर संमतीने विवाह झाला. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी नांदावयास गेल्या नंतर दि. ०७/०२/२०२० रोजी मला मुलगी झाली. हे म्हणणे खरे आहे की, मुलगी अपंग जन्मली. हे म्हणणे खरे आहे की, मी न्यायालयात आल्या पासुन मुलगी सामनेवाल्याकडे आहे. माझे वडील मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मला दोन चुलते असुन माझी आई व भाउ व मी वेगवेगळे रहातो. आमची वडीलोपार्जित शेती देडगाव येथे आहे. देडगाव येथील शेती माझी आई व भाउ करतात. हे म्हणणे खरे नाही की, अपंग मुलगी झाल्यामुळे मी घरात चिडचिड करत असे. हे म्हणणे खरे नाही की, मी घरात दिवस -दिवस झोपून राहत असे, कामधंदा करत नसे. हे मी सांगू शकत नाही की, देडगाव येथील जमीनीवर माझी सासू, वडील व चुलते यांची वारसा हक्काने नावे आहेत. मी दोन वर्षापासून माझ्या आईकडे राहते. मी माझ्या आई व भावाकडे स्वत:हून राहत नाही परंतु सामनेवाला यांनी हाकलून दिल्यामुळे रहाते. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई, चुलते व सासु यांचा शेत जमीनीवरून वाद झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासूने माझ्या आईला व चुलत्याला शेत जमीनीत हिस्सा मागितला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या चुलत्याने शेत जमीनीचा हिस्सा देण्यास नकार दिल्यामुळे मी प्रस्तुतचे प्रकरण न्यायालयात दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला अमोल बरोबर नांदावयास जावू नये असे वाटते. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याने एक रकमी दयावी व माझ्या सोबत फारकत घ्यावी अशी माझी इच्छा आहे.

हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला यांनी लग्नाच्या वेळी मला झुंबर, गंठन, पैंजन, जोडवे असा तीन ते साडेतीन तोळे सोन्याचा ऐवज माझ्या अंगावर घातला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर लग्नात घातलेला ऐवज माझ्याकडे आहे.

हे म्हणणे खरे आहे की, अमोल शेत मजुर आहे. हे म्हणणे खरे आहे की, सासु-सास-यांचे वय ५६ व ५१ असुन दिर माझ्या पती पेक्षा लहान आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझा पती घरातील कर्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सासु - सासरे व दिराची उपजिवीका माझ्या पतीवर अवलंबून आहे.

आता मला नि. ६ वरील जबाबदा-यांचे प्रमाणपत्र दाखविण्यात आले. त्यावर पान क्र. २ वर ताब्यात असलेल्या व्यक्तीचे नाव दिव्या- मुलगी, कपडे व मेडीकल खर्च १०,०००/- रूपये असे माझ्या प्रमाण पत्रात नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या जबाबदारीच्या प्रमाणपत्रामध्ये मुलगी माझ्याकडे असल्याचे खोटे नमुद केले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या जबाबदा-याच्या प्रमाणपत्रामध्ये कोणत्या गोष्टीला किती पैसे लागतात हे नमुद केले नाही. आता मला नि. ९ वरील कौटुंबिक घटना अहवाल दाखविण्यात आला. मी कौटुबिंक घटना अहवाला बाबत न्यायालयात येण्यापुर्वी अर्ज दाखल केला नव्हता. आता मला नि.९ वरील कौटुबिंक घटना अहवाल दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर प्रत्येक पानावर माझ्या सहया आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळी मी अर्ज केला त्यावेळी मी त्या अधिका-याला कौटुबिंक घटना अहवालाची माहिती दिली होती. सदर अहवाल

न्यायालयात येण्यापुर्वी माझे सासु - सासरे व पती यांची बैठक झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर अहवाल येण्यापुर्वी आमच्या पाहुण्या राउळयात मी नांदायला जायचे किंवा नाही याबाबत बैठक झाली होती व त्यामध्ये मी नांदायला जायचे नाही, असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या बैठकीत नांदायला जायचे नाही, असे सांगितल्यामुळे मी पुढे हा अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर मी पोटगी मिळणेकामी प्रथम वर्ग न्यायदंडधिकारी नेवासा, क्रमांक ३ यांच्याकडे दाखल केला आहे व तो आजरोजी प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, लग्नानंतर मी आर.सी.सी बांधकामाच्या घरात राहण्यासाठी गेले. हे म्हणणे खरे आहे की, माहेरी येई पर्यंत मी त्याच घरात राहत होते.

हे म्हणणे खरे आहे की, पाथर्डी येथे माझ्या पतीच्या नावे एक गुंठा देखील क्षेत्र नाही. हे मी सांगू शकत नाही की, संगिता व सोमनाथ यांच्या नावे क्षेत्र आहे किंवा नाही. माझ्या पतीच्या नावे प्लॉट आहे, वेल्डींगचे दुकाण आहे. याबाबत मी कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी माहेरी आल्या पासून व न्यायालयात अर्ज दाखल केल्या पासून माझा, माझ्या पती व सासु- सासा-यांचा एकत्र संपर्क आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तरूण असुन चांगल्या प्रकारे माझ्या आई कडे रहाते. हे म्हणणे खरे आहे की, मी लाखो रूपये खर्च केल्या बाबत व सोने दिल्या बाबत कागदोपत्री पुरावा न्यायालयात दाखल केला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला याला सोने मोडून पैसे दिल्या बाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी न्यायालयात दाखल केला नाही. मी माझ्या पती सोबत तीन वर्ष संसार केला. हे म्हणणे खरे आहे की, मी मला झालेल्या शारीरीक व मानसिक त्रासा बाबत पाथर्डी येथील पोलीस ठाण्यात सामनेवाल्या विरूध्द तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी पती व सासरच्या मंडळी विरूध्द नेवासा येथील पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली नाही. हे म्हणणे आहे की, सामनेवाला यांनी मला एक रकमी रक्कम देवून फारकत दयावी म्हणुन मी प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या माहेरी असलेल्या वडीलोपार्जित शेत जमीनीतुन आम्ही ज्वारी, मका, बाजरी, गहू व उस अशी पिके घेतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या माहेरी आम्ही गायी - म्हशी व शेळयाचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या माहेरी गायी- म्हशी व शेळयाच्या व्यवसायावरून मला दरमहा ५०००/- रूपये उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास काहीही कारण घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला विरूध्द खोटा अर्ज दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मला आजही नव-याकडे जायचे नाही अशी माझी ठाम भुमिका आहे.

**उलटतपास पुर्ण, फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR

Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR Date: 2025.07.17 13:44:16 +0530

दिनांक :- १७/०७/२०२५

**(डॉ.पी. आर. सुगांवकर)**

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

न्यायालय क्र.१, नेवासा.